# ३ समप्रहर

## नि\वड\क

### तीन नगरसेवकांचे पद रद्द

**नवी मुंबई :** दिघ्यामध्ये एमआयडीच्या जागेवर अनधिकृत बांधकामाचे साम्राज्य उभे करणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक नवीन गवते, अपर्णा गवते, दीपा गवते यांचे पद महापालिका आयुक्त तुकाराम मुंढे यांनी मंगळवारी (२६ जुलै) रद्द केले. आयुक्तांच्या या धडक कारवाईमुळे राष्ट्रवादीच्या गोटात खळबळ उडाली आहे. तक्रारदार व नगरसेवक अशा दोन्ही बाजू ऐकून घेतल्यानंतर मुंढे यांनी हा निर्णय घेतला. दरम्यान, कोणत्याही राजकीय दबावाखाली काम न करण्याच्या आयुक्तांच्या काम करण्याच्या शैलीमुळे अनधिकृत बांधकाम केलेल्या नगरसेवकांचे दाबे दणाणले आहेत.

### डॉ. पिल्लई पुरस्काराने सन्मानित

**पनवेल :** डॉ. डॅफनी पिल्लई यांचा सॅव्ही मॅगझिनच्या वतीने



मुंबईतील ताज येथे आयोजित पंचतारांकित समारंभात सॅव्ही हॉनर सेलिब्रेटिंग सक्सेस अॅवॉर्ड बहाल करून सन्मानित केले. डॉ. पिल्लई या गेली ३० वर्षे शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत. त्या महात्मा शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापक मंडळाच्या अध्यक्ष आणि पिल्लई ग्रुप ऑफ इन्स्टिट्युशनच्या सहसंस्थापिका आहेत. त्या सोरोप्टिमिस्ट इंटरनॅशनल या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या संस्थापक सदस्यासुद्धा आहेत.

### रानसई धरणावर पर्यटकांचा धिंगाणा

**उरण :** सुरक्षेच्या कारणावरून रायगड जिल्ह्यातील अनेक धबधबे, धरणांवर जाण्यास पर्यटकांना मज्जाव करण्यात आला आहे. त्यामुळे रविवारी पर्यटकांनी रानसईकडे धाव घेतली होती. या वेळी काहींनी या ठिकाणी गटारीही साजरी केल्याचे समजते. धरणाचा बांध असलेल्या ठिकाणी पर्यटकांनी प्रवेश करू नये, असे जागोजागी फलक लावूनही अनेकांनी थेट बांधावर प्रवेश केला. काहींनी तर धरणाच्या काठावर जाऊन धरणात उड्याही घेतल्या. दरम्यान, धरणानजीक बंदोबस्त ठेवला जात असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# गव्हाण हद्दीत विका